उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thanc.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६३ /२०२६ दि. १६ /०३/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, उल्हासनगर वाहतुक उप विभाग हद्दीत दि. २०/०३/२०२६ रोजी सिंधी बांधवांचा **'चेटीचंड उत्सव'** निमित्ताने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर मिरवणुकीच्या दरम्यान मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद व No Parking –

१) झुलेलाल मंदीर चौक – साधुबेला चौक – भारतचौक – शिरू चौक – नेहरू चौक – लिंक रोड – न्यु ईरा चौक – शिवाजीचौक – शास्त्रीचौक – हिराघाट – पवई चौक या मिरवणुक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना चेटीचंड महायात्रा मिरवणुक पवई चौक पर्यत **"प्रवेश बंद" व "No Parking"** करण्यात येत आहे.

(वरील नमुद मार्गावरील वाहतुक तसेच रहदारी मिरवणुक संपे पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक त्या पर्यायी मार्गाने वळविण्यात येईल.)

पर्यायी मार्ग –

अ) झुलेलाल मंदिर चौक – झुलेलाल मंदिर मार्ग – भारत चौक – गोल मैदान – तसेच बिलगिट व इतर ठिकाणी जाणारी वाहतूक ही झुलेलाल चौक येथून खेमानी मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) उल्हासनगर वाहतूक उप विभाग समोरील चौक येथून भारत चौक मार्गे खेमानी – धोबीघाट – झुलेलाल चौक मार्गे जाणारी सर्व प्रकारची वाहने उल्हासनगर वाहतूक उपविभाग कार्यालय येथून ओटी नं. १ मार्गे बाबा बसंतराम दरबार – मच्छी मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील.

क) भारत चौक मार्गे – गोल मैदान नेहरु चौक कडे जाणारी वाहतूक ही मच्छी मार्केट तसेच बाबा बेफिक्री चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

ड) नेहरु चौक मार्गे – शिरु चौक तसेच खेमानीकडे जाणारी वाहतुक ही मच्छिमार्केट व भारत चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

इ) शिवाजी चौकात – अंबरनाथ शहराकडुन कल्याण बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने फॉलवर लाईन मार्गे जवाहर हॉटेल – नेहरू चौक – गोल मैदान – मधुबन चौक – गुरूद्वारा चौक – शांतीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

ई) शास्त्री चौक मार्गे – हिराघाटकडे जाणारी वाहतुक ही स्मशानभुमी चौक येथुन काजल पेट्रोलपंप मार्गे इच्छित स्थळी जातील.

ऊ) कल्याण अंबरनाथ रोडने – अंबरनाथ दिशेने जाणारी वाहतूक होंडा शोरुम येथे डावीकडे वळण घेवून डॉल्फीन क्लब – गुरुद्वारा चौक – मधुबन चौक – नेहरु चौक – जवाहर हॉटेल – फॉलवर लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि. २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते २०:०० वा.पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

प्रत कार्यवाहीसाठी :–
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे.

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग./प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.